म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १८२६
१९२३
१८२६

मुलांमुलींकरितां

# बालसुभाषित.

ए. पी. बापट अँड ब्रद्र्स,
बुकसेलर्स, बुधवार पेठ, पुणें.

किंमत ०—३—०.

REFBK-0002365
REFBK-0002365

मराठी शाळेंतील शिशुवर्ग ते ४ इयत्तांकरितां

# बालसुभाषित.

संपादक

भिकाजी विठ्ठल महाजन.

हेडमास्तर, नवीन मराठी शाळा, पुणें.

प्रकाशक

ए. पी. बापट, बुकसेलर, बुधवार पेठ, पुणें.

सन १९२३.

( सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ३ आणे.

A. BAPAT & BROS. BOOKSELLERS, PUBLISHERS & NEWS AGENT. POONA CITY. INDIA.
REFBK-0002365
REFBK-0002365

मुद्रक

गोपाळ बळवंत जोशी, 'आनंद' छापखाना.

३३० सदाशिव पेठ, पुणें शहर.

# प्रस्तावना.

लहान मुलांकडून स्तोत्रें, भूपाळ्या, श्लोक इत्यादि पाठ करून घेण्याची जुनी वहिवाट चांगली होती, परंतु आज ती अगदींच नामशेष झालेली आहे. वाणी शुद्ध होण्यास अशा पाठांतराचा फार उपयोग होत असे. अजून सुद्धां बऱ्याच मुलांना त्यांच्या पुस्तका बाहेरच्या पुष्कळ कविता पाठ येत असल्याचें दिसून येतें. अशा मुलांनीं कोठल्या तरी कविता पाठ करण्यापेक्षां कांहीं निवडक व मनोरंजक कविता पाठ केल्यास बरें होईल असें वाटल्यावरून तशा कवितांचें हें छोटेसें पुस्तक तयार केलें आहे. ह्यांतील कविता विशेषतः सुभाषितात्मक असल्यामुळें लहान मुलांची कविता पाठ करण्याची आवड पूर्ण होईल अशी आशा आहे.

ह्या पुस्तकांतील सुभाषितात्मक कविता नवनीत, काव्यदोहन, काव्यामोद, काव्यरत्नावलि, संस्कृत सुभाषितरत्नभाण्डागार इत्यादि काव्यग्रंथांतून निवडलेल्या आहेत. सबंध वर्षांत प्रत्येक इयत्तेंतील मुलांस सहजासहजीं किती कविता पाठ करितां येतात, ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन मग त्यांचा इयत्तावार क्रमही ठरविला आहे. शाळा सुरू होतांच आरंभींचीं ४।५ मिनिटें ह्यांतील कवितेची शिक्षकांनीं २।३ वेळां संथा दिल्यास मुलांना स्पष्ट व शुद्ध भाषेंत कविता म्हणतां येईल, अशी खात्री आहे. वरच्या इयत्तांतील शिक्षकांनीं संथा देण्यापूर्वी गोळा बेरजेनें त्या कवितेचा अर्थ सांगून मग ती त्यांजकडून पाठ करून घ्यावी, अशी त्यांस विनंति आहे.

आमच्या शाळेचे सुपरिंटेंडेंट प्रो. केशव रामचंद्र कानिटकर एम्. ए., बी. एस्. सी ह्यांनीं मीं निवडलेल्या कवितांची पुन्हां निवड करून त्या कविता लहान मुलांकडून पाठ करून घेण्यास आपली मान्यता दिली, ह्याबद्दल त्यांचे आभार मानून ही अल्प प्रस्तावना पुरी करितों.

—संपादक.

# तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

अभंग व आर्या हीं वृत्तें लहान मुलांना विशेषशीं आवडत नाहींत, असें दिसून आल्यावरून ह्या आवृत्तींत त्यांच्या ऐवजीं श्लोकांचा भरणा जास्त केला आहे. तसेंच चौथ्या इयत्तेकरितां ठेविलेल्या संस्कृत श्लोकांत बदल करून त्या ऐवजीं अधिक सोपे श्लोक घातले आहेत. ही व ह्यापुढें निघणारी आवृत्ति काढण्याचें काम माझे मित्र रा. रा. अनंत पांडुरंग बापट ह्यांच्याकडे सोंपविलें आहे.

भिकाजी विठ्ठल महाजनी.

मराठी ... ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३८५
सं. काव्य. ६३६
सं. काव्य.
६३६

# शिशुवर्ग.

आर्या--( भा. दा. पाळंदे. )

प्रातःकाळीं शयनावरुनि उठावें सदा शुची व्हावें ।
ध्यावें देवातें मग कर जोडुनियां तयास विनवावें ॥ १
देवा परम समर्था दीन-दयाळा प्रभो जगन्नाथा
आलों शरण तुला मी दीन तुझ्या ठेवितों पदीं माथा ॥२॥
देवा तव सेवेचा सद्विद्येचा असो मला छंद ।
कीं साधुसंगतीचा यांतचि वाटो मनासि आनंद ॥ ३ ॥

भुजंगप्रयात--( रामदास. )

सदा सर्वदा योग तूझा घडावा ।
तुझे कारणीं देह माझा पडावा ॥
उपेक्षूं नको गूणवंता अनंता ।
रघूनायका, मागणें हेंचि आतां ॥ ४ ॥
उपासनेला दृढ चालवावें ।
भूदेव संतांसि सदा नमावें ॥
सत्कर्मयोगें वय घालवावें ।
सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥ ५ ॥

भुजंगप्रयात--( गं. सी. अतीतकर. )

परा दुःख देणें असे पाप मोठें ।
तयापासुनी आपुले होति तोटे ॥
दिलें दुःख ज्यानें तया नाठवावें ।
प्रसगीं मना साह्य त्यासी करावें ॥ ६ ॥

उपजाति.

विद्या नसे ज्या पुरुषास कांहीं ।
विचार नीती तिळमात्र नाहीं ॥
तया नरा काय अहो म्हणावें ? ।
पशूंमधें सत्य तया गणावें ॥ ७ ॥

शालिनी—( वामनपंडित. )

सिंहाचा जो बाल, तोही चपेटा-- ।
मारी, त्याला जो करी मत्त मोठा ॥
तेजस्वी जे वृत्ति ऐशीच त्यांची ।
तेथें कांहीं चाड नाहीं वयाची ॥ ८ ॥

वसंततिलका—( ल. रा. पांगारकर. )

ज्यांनीं परार्थ बहु कष्टविलें स्वदेहा ।
नाहीं कधींहि गणिलें सुखवित्तगेहा ॥
त्यांच्यासमान जनकार्य करीन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ ९ ॥

मालिनी.

तरुवर सुफलांच्या आगमीं नम्र होती ।
जलदहि जलभारें खालती फार येती ॥
सुपुरुष विनयातें भाग्यकालीं धरीती ।
उपकृति करित्यांची जाणिजे हीच रीती ॥ १० ॥

## इयत्ता १ ली.

शार्दूलविक्रीडित.

सर्वज्ञा परमेश्वरा सकरुणा बापा दयासागरा ।
आम्ही अज्ञ मुलें तुझीं सकलही तूं बाप होशी खरा ॥
केला कां इतुका अम्हांवरि तुवां देवा असा कोप हा ।
हे आम्ही करुणस्वरें विनवितों आम्हांकडे तूं पहा ॥ १ ॥

शिखरिणी--( वामनपंडित. )

नसे ठावा ब्रह्मा, न शिव, अथवा श्रीपति हरी ।
हरी जो तापातें उचलुनि कृपासिंधु लहरी ॥
हरी वाटे काळा कारिस, वि-पती मृत्युभुजगा ।
जगाचा तूं ऐसा धनि कवण तो पाव मजगा ॥ २ ॥

पृथ्वी—( गो. वा. कानिटकर. )

करून, न करून वा ! घडति पातकें हातुनी ।
भयंकर असे किती तरी विचार येती मनीं ॥
क्षमा करुनि लेंकरा, वद 'मदीय हा लाडका' ।
करील जननी जसे, जन दुजा करी लाड का ॥ ३ ॥

पृथ्वी--( ना. वा. टिळक. )

प्रभो श्वसन एकदां, स्तुति तुझी पुन्हा एकदां ।
असा क्रम धरीन मी, मज नको दुजी संपदा ॥
तुझ्यासम सखा कसा कधिं कुणा कुठे सांपडे ।
सदा तव कृपालुता काथिन ह्यापुढें त्यापुढें ॥ ४ ॥

आर्या--( मोरोपंत. )

तूं सागर करुणेचा, देवा तुजलाचि दुःख सांगावें ।
तुजवांचुनि इतराशीं दीनें पसरोनि तोंड कां गावें ? ॥५॥
मधुर सदा बोलावें सुविचारातें कदा न सोडावें ।
खाद्य न चोरावें तें वर्तन डावें कधीं नसों द्यावें ॥ ६ ॥
दुःख परासि न द्यावें, सत्य वदावें, क्षमा न सोडावी ।
जोडावी कीर्ति, अशी कुलरीति तुम्ही कधीं न मोडावी ७

शार्दूलविक्रीडित.

बोले सत्य सदा, करी झटुनियां अभ्यास जो चांगला ।
जातो घेउनि, धाकट्या निशिदिनीं शाळेस जो बंधुला ॥
नाहीं हट्ट करीत जो मुळें अहा, देई न गाली कुणा ।
समजे भाउ खरोखरी जगतिं या, तोची खरा शाहणा ॥८॥

स्वागता--( वामनपंडित. )

वृक्ष फार लवती फलभारें । लोंबती जलद घेउनि नीरें ॥
थोर गर्व न धरी विभवाचा । हा स्वभाव उपकारपराचा

ललित—( प. ब. गोडबोले. )

संपदा असे बहुत ज्या घरीं ।
खावया तिथें मिळति सोयरीं ॥
द्रव्य संपतां पळति तेथुनी ।
कोणि पाहिना जवळ येउनी ॥ १० ॥

भुजंगप्रयात—( गं. सी. अतीतकर. )

धनाकारणें यत्न न्यायें करावा ।
बुधां मान्य हो मार्ग ऐसा धरावा ॥
मना लाभ हानी घडे दैवयोगें ।
नको दुःख मानूं तयाच्या वियोगें ॥ ११ ॥

वसंततिलका—( ल. रा. पांगारकर. )

जे शूर, वीर, कवि, साधु, विचारवंत ।
जे राष्ट्रनायक, धुरंधर, जे महंत ॥
त्यांच्या स्मरेन कृति पुण्य उदार जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ १२ ॥

अभंग—( तुकाराम. )

कांहीं न मागे कोणासी । तोचि आवडे देवासी ।
देव तयासी म्हणावें । त्याचे चरणीं लीन व्हावें ॥
भूतदया ज्याचे मनीं । त्याचे घरीं चक्रपाणी ।
नाहीं नाहीं त्या समान । तुका म्हणे मी जामीन १३

भुजंगप्रयात--( रामदास. )

अती लीनता सर्व भावें भजावें ।
सदा सज्जनालागिं संतोषवावें ॥
तयांकारणीं सर्व लावीत जावें ।
सगूणीं अती आदरेंशीं भजावें ॥ १४ ॥
मना, मानसीं व्यर्थ चिंता वहाते ।
अकस्मात होणार होऊन जातें ॥
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें ।
मतीमंद तो खेद मानी वियोगें ॥ १५ ॥

## इयत्ता २ री.

पृथ्वी—( गो. वा. कानिटकर. )

अनुग्रह करीं त्वरें मजवरी जगच्चालका ।
दया करुनि दिव्य दे त्वरित दृष्टि या बालका ॥
न सांग बुडवील कीं जल भवाब्धिचें घातकी ।
मिळे तव कृपा तरी तरिच हा तरे पातकी ॥ १ ॥

पृथ्वी--( ना. वा. टिळक. )

मदीय मतिचे वृथा सकळ यत्न हे वाटती ।
विचार मम थोरही तुजपुढें प्रभो ! हे किती ॥
तुझी स्तुति कुठून रे मज अशा जडा साधती ।
तथापि मज बोलवी तव पदारविंदीं रती ॥ २ ॥

वसंततिलका—( वि. कों. ओक. )

आहे विचित्र करणी परमेश्वराची ।
तेथें मनुष्यमति कुंठित होय साची ॥
त्यानें दिले नियम घालुनि जे सुभावें ।
ते मानवीं सकल मानित नित्य जावे ॥ ३ ॥

वसंततिलका—( भा. त्र्यं. परांजपे. )

न्यायें सदा विचरती सुख त्या मिळावें ।
अन्याय-मार्ग-गत त्यांप्रति दुःख व्हावें ॥
ही रीति सर्व जगताप्रति लावण्याला ।
झाला समर्थ वद काय म्हणूं तयाला ? ॥ ४ ॥

मी कोण ? कोठुनि कशास्तव येथ आलों ? ।
हीं इंद्रियें धरुनि सज्ज कशास झालों ? ॥
कर्तव्य काय मज येथ करावयाचें ? ।
मेल्यावरी मग कुठें मज जावयाचें ? ॥ ५ ॥

शिखरिणी.

कधीं मी कर्तव्यच्युत दिसुनि आलों जरि तुला ।
कधीं मी आलस्यीं क्षण उगिच देवा ! दवडिला ॥
महोग्रा दीप्तीनें त्वरित तरि शासूनि मजला ।
खऱ्या कर्तव्याचा जगतिं पथ दावीं बहु भला ॥ ६ ॥

द्रुतविलंबित—( वामनपंडित. )

उपजणें मरणें न चुके नरा ।
फिरत नित्य असे भव–भोंवरा ।
उपजला तरि तोच मला गमे ।
कुल समुन्नति ज्यास्तव घे, रमे ॥ ७ ॥

भुजंगप्रयात—( रामदास. )

विवेकें क्रिया आपुली पालटावी ।
अती आदरें शुद्धबुद्धी धरावी ॥
जनीं बोलण्यासारिखें चाल बापा ।
मनीं कल्पना सोड संसारतापा ॥ ८ ॥

वसंततिलका—( वि. कों. ओक. )

बा अंतकाळ तुज येइल जाण जेव्हां ।
होतील व्यर्थ सगळेहि उपाय तेव्हां ॥
जाणे पडेल तुज सोडुनि हा पसारा ।
सत्कारणीं खरच ह्यास्तव काळ सारा ॥ ९ ॥

आर्या—( मोरोपंत. )

सर्वांशीं मायेनें वागें मायाच जाण माया वी ।
मायावी वर्तन तें त्यज जरि वाटे गृहांत मा यावी १०
सावध सदा असावें, संसारीं स्वहित–कृत्य लक्षावें ।
पुरुषार्थाचें साधन बा ! धनसें हें शरीर रक्षावें ॥ ११ ॥

ग्रंथ संग्रहालय ... ६३५

आर्या—( गं. रा. मोगरे. )

कोणी साह्य करो वा न करो कर्तव्य होय जें कर्म ।
केलेंच पाहिजे तें; श्रेयस्कर हाच आपणां धर्म ॥ १२ ॥
आपण लोकांसाठीं लोकहि म्हणुनीच आपणांसाठीं ।
विसरूं नये कधीं हें कीं ह्या प्रभुनेंच घातल्या गांठी १३

मालिनी—( वामनपंडित. )

धनपति जरि तूं रे, मी असें शास्त्रवेत्ता ।
भट समरिं जरी तूं, मी महा—वादिजेता ॥
अनुचर जरि तूतें सेविती, छात्र मातें ।
न गणिशि मज, जातां तुच्छ मानूनि तूतें ॥ १४ ॥

वसंततिलका—( वि. कों. ओक. )

जो ज्ञानहीन नर तो पशुतुल्य जाणा ।
ऐसा सदर्थ कवि सांगतसे शहाणा ॥
तो सत्य सत्य, लवलेश न यांत खोटें ।
ध्यानीं धरा हित घडेल तुम्हांस मोठें ॥ १५ ॥

भुजंगप्रयात.

जसा वर्तती लोक कल्याणकारी ।
जगीं वर्तती लोकही त्या प्रकारीं ॥
वदे तो सदा चार शास्त्रार्थ जैसे ।
जगीं वर्तती लोकही सर्व तैसें ॥ १६ ॥

वसंततिलका--( ल. रा. पांगारकर. )

आपद्गत स्वजन पाहवती न डोळां ।
तत्क्लेश ते बघुनि होतहि जीव गोळा ॥
तद्दुःख दूर करण्यास झटेन जेव्हां ।
मज्जन्म हा सफल होइल जाण तेव्हां ॥ १७ ॥

उपजाति—( वामनपंडित. )

निंदोत वानोत सुनीति मंत ।
चलो असो वा कमला गृहांत ॥
हो मृत्यु आजीच घडो युगांतीं ।
सन्मार्ग टाकोनी भले न जाती ॥ १८ ॥

अभंग—( तुकाराम. )

धनवंतालागीं । सर्व मान्यता हे जगीं ॥ १ ॥
माता पिता बंधू जन । सर्व मानिती वचन ॥ २ ॥
जंव चाले मोठा धंदा । तंव बहीण म्हणे दादा ॥ ३ ॥
सदा शृंगार भूषणें । कांता लवे बहुमानें ॥ ४ ॥
तुका म्हणे धन । भाग्य अशाश्वत जाण ॥ ५ ॥ १९

सवाई.

वैभव शाश्वत नाहिंच यास्तव कांहिं तरी उपकार करा ।
धर्मचि हा परलोक-सखा निज-तारणिं हाचि उपाय बरा॥
दुर्जन-संगति सोडुनि दुर्मति सज्जन-संगति नित्य धरा ।
श्रीहरिचे मनिं पाय धरा, निज-तारणिं हाचि उपाय बरा

सं.काव्य.

## इयत्ता ३ री.

पृथ्वी—( मोरोपंत. )

'अगा ! प्रणतवत्सला !' म्हणति त्या जनां पावलां ।
म्हणोनि तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां ॥
'करूं बरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला'।
असें मनिं धरा, खरा भरंवसा मला आपला ॥ १ ॥

सुसंगति सदा घडो, सुजन-वाक्य कानीं पडो ।
कलंक मतिचा झडो, विषय सर्वथा नावडो ॥
सदंघ्रि कमळीं दडो, मुरडितां हटानें जडो ।
वियोग घडतां रडो, मन भवच्चरित्रीं जडो ॥ २ ॥
न निश्चय कधीं ढळो, कुजन-विघ्न-बाधा टळो ।
न चित्त भजनीं चळो, मति सदुक्तमार्गीं वळो ॥
स्वतत्त्व हृदया कळो, दुरभिमान सारा गळो ।
पुन्हा न मन हें मळो, दुरित आत्मबोधें जळो ॥३॥

भुजंगप्रयात—( गं. सी. अतीतकर. )

मनासारिखें बोलतां मोद होतो ।
कटू भाषणीं मित्रही शत्रु होतः ॥
हिताचीं वचें वाउगीं होति त्यासी ।
खऱ्या भाषणीं कोप येई पित्यासी ॥ ४ ॥

शार्दूलविक्रीडित—( यशवंत. )

“ माझा देइल तो हरी ” भ्रम असे त्वन्मानसीं व्यर्थ हा ।
कष्टावांचुनि तो हरी न सखया ! कोणास देई पहा ॥
आकांक्षा जरि थोर ही तव मनीं “ खावें तुपाशीं सदा ” ।
घामानें निढळाचिया करुनियां ती तृप्ति घ्यावी तदा ॥५॥

पृथ्वी--( कृ. के. दामले. )

‘ चुकी भरुनि काढणें फिरुनि हें घडेना कधीं ’ ।
असें प्रकट होतसे अदय सत्य चित्तामधीं ॥
म्हणूनि अनिवार हें नयनवारि जें वाहतें ।
असे अहह ! शक्त का कवणही टिपायास तें ? ॥६॥

शार्दूलविक्रीडित—( वामनपंडित. )

हस्तीतें धुतलें, जळीं बसविलें, मालिन्यही नाशिलें ।
तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें ॥
शुंडाग्रें धरिलें धुळीस, भरिलें सर्वांगही आपुलें ।
प्रायश्चित्त दिलें तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें ॥ ७ ॥
जों हे स्वस्थ तनू जरा वसतसे जों दूर जों इंद्रियें ।
शक्तें जों सरलें न आयु पुरतें तों शाहण्यानें स्वयें ॥
आत्मप्राप्ति सुखार्थ यत्न करणें कीं तोच हा फारसा ।
होतां मंदिर दीप्त कूपखननीं उद्योग तो कायसा ॥ ८ ॥

... ग्रंथ संग्रहालय ...

हे तों सत्पुरुष, स्वकार्य त्यजिती अन्यार्थही साधिती ।
हे तों मध्यम, जे निजार्थ करुनी अन्यार्थ संपादिती ॥
हे तों राक्षस, जे स्वकार्यविषयीं अन्यार्थ विध्वंसिती ।
जे कां व्यर्थ परार्थहानि करिती ते कोण कीं दुर्मति ॥९॥

वसंततिलका--( वामनपंडित. )

दे दान गुप्त, उपकार करी, न बोले ।
मानी प्रमोद जरि मान्य घरास आले ॥
दावी न गर्व विभवें, गुण घे पराचे ।
खड्गाग्रतुल्य विषम-व्रत हें भल्याचें ॥ १० ॥
द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश ।
कीं दान, भोग अथवा तिसरा विनाश ॥
जो घे न भोग जरि, पात्र-करीं न देही ।
त्याच्या धनास मग केवळ नाश पाहीं ॥ ११ ॥

शिखरिणी--( वामनपंडित. )

वरें तें या देहीं महिवरि कडेलोट करणें ।
महासर्पाच्या कीं वदनिं तरि हा हात धरणें ॥
उडी कीं वन्हींत त्वरित तरि घालूनि मरणें ।
जळो तें जें लोकीं त्यजुनि निज सच्छील फिरणें १२
करीं साजे त्याग, श्रवण-युगुलीं सच्छ्रवण जें ।
मुखीं सत्य, स्वच्छाचरण विलसे, शौर्यहि भुजें ॥

स्वशीर्षें थोराला नमन, विभवावांचुनि पहा ।
भल्याचा कीं स्वाभाविक शुभ अलंकार-विधि हा १३

मालिनी—( गो. वा. कानिटकर. )

जनपदहित साधी, मेळवी जो जयाला ।
स्वजनहित करूनी त्या सुकार्यीं निमाला ॥
जनपदहितकर्ता नांव हें त्यास लाधे ।
सकल जन तयाला नित्य गातात मोदें ॥ १४ ॥

वसंततिलका—( ल. रा. पांगारकर. )

ज्यांनीं स्वदेशयश भूवरि गाजवीलें ।
ज्यांनीं स्वदेश इतिहासहि साजवीले ॥
त्यांचे चरित्रगुण गाइन नित्य जेव्हां ।
मज्जन्म हा सफळ होइल जाण तेव्हां ॥ १५ ॥

अभंग—( तुकाराम. )

जे कां रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ॥ १ ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंची जाणावा ॥ २ ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसें सज्जनांचें चित्त ॥ ३ ॥
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासि धरी जो हृदयीं ॥ ४ ॥
दया करी जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ५ ॥
तुका म्हणे सांगों किती । तोचि भगवंताची मूर्ति ॥ १६ ॥

शार्दूलविक्रीडित—( यशवंत. )

संपत्काळ तसा विपत्समयही ये दैवकोपामुळें ।
यच्चित्तांतुनि धैर्यनीति न चळे, शांति क्षमा ना ढळे ॥
सच्चारित्र्य-तपें जगीं तळपतो जैसा नभीं भास्कर ।
ऐशा त्या नरपुंगवास म्हणती 'तो कर्मयोगी' नर ॥ १७॥

आर्या.

सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप ।
खोटें भाषण करणें सज्जन म्हणतात हें महापाप ॥ १८ ॥

आर्या—( मोरोपंत. )

सत्यातें जोडावें, सुज्ञें धर्मासि पळ न सोडावें ।
पाशातें तोडावें, धीरें न कदापि पाप जोडावें ॥ १९ ॥

आर्या—( गं. रा. मोगरे. )

प्रेमें प्रेम बळावे, द्वेषानें अधिक वाढतो द्वेष ।
प्रेमें उदया आले, द्वेषानें ओस पाडिले देश ॥ २० ॥
दुर्व्यसनानें मेले तितके मेले न शस्त्रधारांनीं ।
दुष्काळांनीं अथवा ज्वरातिसारादिकां विकारांनीं २१

दुर्व्यसनें द्रव्याची होय यशाचीहि आपुल्या होळी ।
इहपरलोकसुखाची मग कां व्हावी न राखरांगोळी ॥२२॥

शार्दूलविक्रीडित—( वि. भ. लेंभे. )

जाईं तूं फिरण्या कुठेंहि जगतीं, भूगर्भदेशीं, जळीं ।
जाईं उत्तरदक्षिणध्रुवपथें, वा तारकामंडळीं ॥
नौकेमाजि बसोनियां जलनिधी ओलांडुनी जाय रे ।
प्रेमें वत्सल चित्त तें जननिचें संगें तुझ्या बा ! फिरे २३

शार्दूलविक्रीडित—( वामनपंडित. )

विद्या हें पुरुषास रूप बरवें, कीं झांकिलें द्रव्यही ।
विद्या भोग-सुकीर्ति-दायक पहा, ते मान्य मान्यांसही ॥
विद्या बंधु असे विदेश-गमनीं, विद्या महा देवता ।
विद्या पूज्य नृपास, हा नर पशू ती वेगळा तत्वतां ॥२४॥
तूं राजा जरि, मी श्रुतिस्मृति-महा-विद्याभिमानी असें ।
भाग्यें विश्रुत तूं, मदीय कविता--सत्कीर्ति लोकीं वसे ॥
आहे अंतर फार तूज मज रे, तूं गर्व जैं दाविशी ।
मीही निस्पृह, भाग्यवंत--गणना नाहीं मला फारशी ॥२५

## इयत्ता ४ थी.

पृथ्वी--( मोरोपंत )

सदाश्रितपदा, सदाशिवमनोविनोदास्पदा, ।
स्वदासवशमानसा, कलिमलांतका, कामदा, ॥
वदान्यजनसद्गुरो, प्रशमितामितासन्मदा, ।
गदारिदरनंदकांबुजधरा, नमस्ते सदा ॥ १ ॥

अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार, बा हे विधी ।
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केविं धी ॥
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मति ।
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ॥ २ ॥

मुखीं हरि वसो तुझी कुशल धाम नामावली ।
क्षणांत पुरवील जी सकळ कामना मावली ॥
कृपा करिशि तूं जगत्रय-निवास दासांवरी ।
तशी प्रकट हे निजाश्रितजना सदा सावरी ॥ ३ ॥

शार्दूलविक्रीडित—( वि. भ. लेंभे. )

प्रेमाचें अति दिव्य कोमल असें वारें बघूं पाहसी ।
बुद्धीचे अतिशुद्ध, सत्य, अवघे सिद्धांत तूं मागसी ॥
तूतें शुद्ध, अगाध, वत्सल असें बा पाहिजे चित्त रे ।
पाहें प्रेमळ दृष्टि ती जननिची, ब्रह्मांड जेथें भरे ॥ ४ ॥

शार्दूलविक्रीडित—( यशवंत. )

ज्याचा देह झिजे अखंडितपणें कार्यार्थ लोकांचिया ।
माता-बंधु-पित्यासमान सकलां चित्तांत मानूनियां ॥
रक्त-ब्रीद न पातला जरि पुढें देहावसानावधी ।
ऐसा धीर उदार थोर नर जो तो 'कर्मयोगी' सुधी ॥५॥

शार्दूलविक्रीडित—( वामनपंडित. )

लक्ष्मीनें जरि तुष्ट तूं, बहु सुखी मी वल्कलानें असें ।
दोघांचा परितोष तुल्य असतां आधिक्य कांहीं नसे ॥
आशा ज्यास, दरिद्र तोचि समजें, नैराश्य पैं बाणतां ।
भाग्याचा नर कोणता मग बरें निर्भाग्य तो कोणता ॥६॥

सवाई—( वामनपंडित. )

नम्रपणेंच सभेंत महोन्नत,
जे गुण वर्णुनियां परक्याचे ।
सांगितल्याविण दाविति कौशल
सर्व जनांप्रति जे स्वगुणाचे ॥
स्वार्थ परार्थहि साधिति,
जिंकिति शांति-बळें मुखरत्व खळांचें ॥
संत महाद्भुतभाजन यापरि,
सेवन कोण करी न तयांचें ॥ ७ ॥

वसंततिलका--( वामनपंडित. )

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ।
तः क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें ॥
जाणोनि हें सुजन ज्या दुबळीक आली ।
त्याशीं कधीं न करिती सहसा टवाळी ॥ ८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ......
ना.

आर्या.

चुकल्या जनासि कोणी सांगुनि निज-हित-पथासि जो लावी
धनदेंहि उपकृतीसी त्याच्या निजसंपदा न तोलावी ॥९॥

आर्या—( गं. रा. मोगरे. )

व्यर्थ न जाऊं द्यावा उद्योगावांचुनी कधीं काळ।
कीं, उद्योग करी जो, लक्ष्मी त्यालाचि घालिते माळ १०

आर्या--( मोरोपंत )

रक्षावाचि, उपेक्षा व्यसनीं अरिचीहि न करिती संत।
पाहों नयेचि आंगीं बळ असतां दीनजंतुचा अंत ॥ ११ ॥
सुख व्हावें तरि धर्माप्रति म्हण 'माथां वसें, नसें दूर'।
पूजा कैंची लोकीं जरि दगड शिरीं धरी न शेंदूर ॥१२॥
संसार दो दिसांचा, यश जोडी, जो कुलीन तोचि तरे।
द्यावें बरें म्हणोनि स्वपरमुखें जो कुलीनतोचित रे ॥१३

अभंग—( तुकाराम. )

वाघें उपदेशिला कोल्हा। सुखें खाऊं द्यावें मला ॥ १ ॥
अंतीं मरसी तें न चुके। मजही मारीतोसी भुकें ॥ २ ॥
येरू म्हणे भला भला। निवाड तुझ्या तोंडें झाला ॥ ३ ॥
देह तंव जाणार। घडेल पर उपकार ॥ ४ ॥
येरू म्हणे मनीं। ऐसें जावें समजोनी ॥ ५ ॥
गांठी पडली ठकाठका। त्यांचा धर्म बोले तुका ६ ॥१४॥

शार्दूलविक्रीडित—( यशवंत. )

नाहीं मानव ते, नसोत; परि हे पाषाण, ही मृत्तिका ।
यांना मानिसि तुच्छ काय ? गणिसी तूं यांस निर्जीव कां
सांडोनी नर-रक्त-तीर्थ शरिरीं जे जाहले पावन ।
शौर्यस्पर्शहि लाभला सतत ज्यां ते हेच धूलीकण ॥१५॥
जेथें दिक्पट भेदकारक असा वाद्यध्वनी गर्जला ।
"घू घू" शब्द करून तेथ घुबडें संचारिती आजला ! ॥
जेथें वायुसवें मुदें विहरला झेंडा रणप्रेरक ।
पाकोळ्या घिरट्यांस घालिति तिथें हें कां न हृद्भेदक १६

दिंडी.

श्रेष्ठ लोकांतें नम्रपणें सेवी ।
दुर्बळांवरि आदरें प्रेम ठेवी ॥
जरी कोणी तूजला क्रोध दावी ।
जपुनि तेथें त्वां शांति आदरावी ॥ १७ ॥

मालिनी—( वामनपंडित. )

मलिन रुधिर-मांसावेगळें हाड दैवें ।
अवचट मिळतां तें श्वान संतोष पावे ॥
क्षुधितहि गजहंता जंबुकातें न मारी ।
अवसरिं समजावी क्षुद्रता आणि थोरी ॥ १८ ॥

शार्दूलविक्रीडित—( वामनपंडित. )

मौनें मूक दिसे; वदे तरि महा वाग्मा, स्वपार्श्वीं फिरे ।
तेव्हां धीट, तसा विवेकचि नसे जैं चालतां अंतरें ॥
शांतीनें तरि भ्याड, शांति न धरी तैं गांवढा, यापरी ।
सेवाधर्म असा अगाध कथिला हा जाण योगीश्वरीं ॥१९

शार्दूलविक्रीडित—( रा. ग. गडकरी. )

जे जे रोग मनास होति हृदया संताप जो जाळितो ।
जे जे घाव जिवास लागुनि जगा जो नित्य कंटाळतो ॥
त्या त्या विस्मृति हेंच औषध खरें आहे गमे एक तें ।
जें लोकीं नसतें तरी मग कुणी जीवंत ना राहतें ॥ २० ॥

वसंततिलका—( वामनपंडित. )

विद्या समन्वितहि दुष्ट परि त्यजावा ।
त्याशीं बुधें न सहवास कधीं करावा ॥
ज्याच्या असे विमलही मणि उत्तमांगीं ।
तो सर्प काय न डसे खल अंतरंगीं ॥ २१ ॥

भुजंगप्रयात—( गं. सी. अतीतकर. )

नको दाखवूं दीनता तूं जनांला ।
प्रसंगीं मना धैर्य द्यावें स्वतांला ॥
कसें होय याची न चिंता करावी ।
मना सर्वदा मोदवृत्ती धरावी ॥ २२ ॥

६

चामर—( किरात. )

बुद्धिहीन पक्षिजात, त्यांसही परी कळे ।
संघशक्तिचें रहस्य, जें नरा न आकळे ॥
वैरभाव, यादवी, तटस्थ वृत्ति हीं लया ।
गेलियाविणें कधीं न कोणि पावती जया ॥ २३ ॥

शार्दूलविक्रीडित—( गं. रा. नरसिंगपूरकर. )

बाळें हीं न परंतु कल्पतरु हे आधार जे आपुले ।
हे देतील फळें अनर्घ्य जरि ह्यां अत्यादरें पोषिलें ॥
या बाळांत कवीश, पंडित, महायोद्धे असे सन्मणी ।
नाना वृक्ष जसे लपोनि असती अत्यल्प बीजांतुनी ॥२४॥

शार्दूलविक्रीडित—( भि. वि. महाजन. )

नीतीनें करि राज्य, तोचि नृपती धन्यत्व पावे सदा ।
धर्मांकारणिं होय सद्व्यय जिचा धन्याच ती संपदा ॥
धन्या तीच पवित्र बुद्धि, रमते सत्कर्मिं रात्रंदिनीं ।
धर्मापासुनि लेशही न ढळतो, तो धन्य विद्वज्जनीं ॥ २५ ॥

# संस्कृत श्लोक.

### शार्दूलविक्रीडित.

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ॥
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ।

### उपजाति.

येषां न विद्या न तपो न दानं ।
ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ॥
ते मृत्युलोके भुवि भारभूताः ।
मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ॥ २ ॥

न चोरहार्यं न च राजहार्यं ।
न भ्रातृभाज्यं न च भारकारी ।
व्यये कृते वर्धत एव नित्यं ।
विद्याधनं सर्वधनप्रधानम् ॥ ३ ॥

दानेन भूतानि वशीभवन्ति ।
दानेन वैराण्यपि यान्ति नाशम् ।
परोऽपि बन्धुत्वमुपैति दानैर् ।
दानं हि सर्वव्यसनानि हन्ति ॥ ४ ॥

अरक्षितं तिष्ठति दैवरक्षितं ।
सुरक्षितं दैवहतं विनश्यति ॥
जीवत्यनाथो विपिनेऽप्यरक्षितः ।
कृतप्रयत्नोऽपि गृहे विनश्यति ॥ ५ ॥

परोपकाराय फलन्ति वृक्षाः ।
परोपकाराय वहान्ति नद्यः ॥
परोपकाराय दुहन्ति गावः ।
परोपकारार्थ मिदं शरीरम् ॥ ६ ॥

दरिद्रता धीरतया विराजते ।
कुरूपता शीलतया विराजते ॥
कुभोजनं चोष्णतया विराजते ।
कुवस्त्रता शुभ्रतया विराजते ॥ ७ ॥

क्षते प्रहारा निपतन्त्य भीक्ष्णं ।
धनक्षये वर्धति जाठराग्निः ॥
आपत्सु वैराणि समुद्भवन्ति ।
छिद्रेष्वनर्थो बहुली भवन्ति ॥ ८ ॥

भार्या वियोग स्वजनापवादो ।
ऋणस्य शेष कृपणस्य सेवा ॥
दरिद्रकाले प्रिय दर्शनं च ।
विनाग्निना पञ्च दहन्ति कायम् ॥ ९ ॥

[faint library stamp]

कुग्रामवासः कुजनस्य सेवा ।
कुभोजनं क्रोधमुखी च भार्या ॥
मूर्खश्च पुत्रो विधवाच कन्या ।
विनाग्निना संदहते शरीरम् ॥ १० ॥

मालिनी

नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके ।
जनपदहितकर्ता त्यजते पार्थिवेन ॥
इति महति विरोधे वर्तमानेऽसमाने ।
नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ॥ ११ ॥

वसंततिलका.

वैद्या वदन्ति कफपित्त मरुद्विकारान् ।
ज्योतिर्विदो ग्रहगतिं परिवर्तयन्ति ॥
भूताभिषङ्ग इति भूतविदो वदन्ति ।
प्राचीन कर्म बलवन्मुनयो वदन्ति ॥ १२ ॥

गवाशनानाम् स शृणोति वाक्यम् ।
अहं हि राजन् पठितं मुनीनाम् ॥
न तस्य दोषौ नच मद्गुणो वा ।
संसर्गजा दोषगुणा भवन्ति ॥ १३ ॥

आर्या.

आपदि मित्रपरीक्षा शूरपरीक्षा रणांगणे भवति ।
विनये वंशपरीक्षा स्त्रियः परीक्षा तु निर्धने पुंसि ॥१४
विरला जानन्ति गुणान् विरलाः कुर्वन्ति निर्धनस्नेहान् ।
विरलाः परकार्यरताः परदुःखेनाऽपि दुःखिता विरला १५

---

REFBK-0002365
REFBK-0002365

## राष्ट्रगीत.

( बँडची चाल. )

प्रार्थना असो तुला । सदय विश्वमंगला ॥
दीर्घायुर्बल तसें । भूपतीस द्या कसें ॥
हिंदभूमिला सदा । दाखवीं न आपदा ॥
शांतता जगीं वसो । कलह केधवां नसो ॥
एक आस पुरवि ही । धन्य धन्य हो मही ॥ १ ॥